**पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर**
**पोलीस कल्याण शाखा**
मालटेकडी जवळ, कॅम्प रोड अमरावती
ई-मेल cp.amravati@mahapolice.gov.in

दिनांक ०८/०१/२०२५

# प्रेस नोट

दिनांक 08/01/2025 रोजी मा. पोलीस आयुक्त मा. श्री. नविनचंद्र रेड्डी यांचे अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनात पोलीस वर्धापन दिन कार्यक्रम चे औचित्य साधुन स्वच्छ व सुंदर पोलीस स्टेशन राखणेकरिता आयोजित स्पर्धेतील उत्कृष्ट तीन पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी यांना प्रशस्तिपत्र व चषक देवुन गौरविण्यात आले. त्यामधे उत्कष्ट पोलीस स्टेशन मधे प्रथम क्र. राजापेठ पोलीस स्टेशन द्वितीय क्र. बडनेरा तृतीय क्र. भातकुली पोलीस स्टेशनला देण्यात आला.

तसेच पर्यावरण पुरक गणेश मंडळ व दुर्गा मंडळ स्पर्धेतील विजेते यांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्र. देवुन त्यांना मा. पोलीस आयुक्त मा. श्री नविनचंद्र रेड्डी यांचे हस्ते प्रशस्तीपत्र व चषक देवुन गौरविण्यात आले. गणेश मंडळामधे आयुक्तालय स्तरावर प्रथम क्र. बालगणेश उत्सव मंडळ साऊर, द्वितीय क्र. श्री बजरंग गणेश उत्सव मंडळ पटवीपुरा , तृतीय क्र. जयहिंद गणेशोत्सव मंडळ बारीपुरा यांना देण्यात आला.आयुक्तालय स्तरावरील नवदुर्गा मंडळे यातील स्पर्धेतील प्रथम क्र. एकता सार्वजनिक नवदुर्गोत्सव मंडळ आसरा, द्वितीय क्र. श्री. अंबानगरी नवदुर्गोत्सव मंडळ भाजीबाजार,तृतीय क्र. झिरी दुर्गोत्सव मंडळ झिरी परिसर यांचा गौरव करण्यात आला. तसेच विभाग निहाय प्रथम , द्वितीय व तृतीय क्रमांकाचे गणेश मंडळ व दुर्गा मंडळ यांना सुद्धा गौरविण्यात आले. स्पर्धेकरिता लाभलेले परिक्षक मंडळातील पदाधीकारी श्री .अजय गाडे, श्री. विनायक ठाकरे, श्रीमती पल्लवी शिंदे, श्रीमती प्रतिभा तेटु ,श्री आर. बी. गुजर यांना सुद्धा प्रशस्तीपत्र देवुन गौरविण्यात आले.

पोलीस स्टेशन व सायबर गुन्ह्यामधे आरोपीतांकडुन हस्तगत मुद्देमाल कोर्टाचे आदेशाने मुळ मालकास पोलीस आयुक्त यांचे हस्ते परत करण्यात आले. ज्यामधे जावरे ज्वेलर्स येथील दरोड्यातील चांदी व पो.स्टे. गाडगेनगर हद्दीतील घरफोडीतील सोने व मोटारसायकल चोरी चे गुन्हयातील मोटार सायकल मुळ मालकास परत करण्यात आली. सायबर गुन्हयात फरवणुक/ हरविलेले मोबाईल हॅन्डसेट असा एकुण 21,83,900/- ((एकविस लाख त्र्यएंशी हजार नउशे रु. चा माल) मुळ मालकास परत करण्यात आला व काही रुपये फ्रिज करण्यात आले.

मा. पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात वाहतुक विभागाने केलेल्या कार्यावाहीतील जप्त 119 मोडीफाय सायलेंसर व 78 प्रेशर हॉर्न पोलीस मुख्यालय येथे रोड रोलर फिरवुन नष्ट करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस उपायुक्त (मुख्यालय), श्री. गणेश शिंदे पो.उपायुक्त परिमडळ-2, तसेच सर्व सहायक पोलीस आयुक्त , ठाणे व शाखा प्रभारी अधिकारी , पोलीस अंमलदार व शांतता समीती, मोहल्ला समीती चे सदस्य , फिर्यादी , मुळ मालक गणेश व दुर्गोत्सव मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.



आयुक्तालय अमरावती
महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन २०२५
आदर्श
मंडळ
२०२४
पोलीस आयुक्तालय अमरावती शहर
सन्मानपत्र
GANESH SHINDE
NAVINCHANDRA REDDY



पोलीस


पोलीस आयुक्तालय अमरावती शहर
महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन २०२५
आदर्श दुर्गोत्सव/गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२४
बक्षिस
श्री. गणेश शिंदे
पोलीस उपायुक्त (परि-२)
श्री. सागर पाटील
पोलीस उपायुक्त (परि-१)


महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
अमरावती शहर
महाराष्ट्र पोलीस
अमरावती शहर
महाराष्ट्र पोलीस
अमरावती शहर
महाराष्ट्र पोलीस
अमरावती शहर


पोलीस आयुक्तालय अमरावती शहर
महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन २०२५
आदर्श दुर्गोत्सव/
मंडळ स्पर्धा २०२४


पोलीस आयुक्तालय अमरावती शहर
महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन २०२५
गणेशोत्सव मंडळ स्पर्धा


पोलीस आयुक्तालय अमरावती शहर
महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन २०२५


पोलीस आयुक्तालय अमरावती शहर
महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन २०२५